# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

**५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.**

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com


फॉर्म किंमत - रु.१००/-

क्र. कोविमं/ भांडार/द्वितीय गुणपत्रक, प्रमाणपत्र छपाई/ के-०८/1073

दिनांक :- 02 JUL 2024

प्रति,

व्यवस्थापक,

-------------------------------

-------------------------------

-------------------------------

विषय :- द्वितीय गुणपत्रक, प्रमाणपत्र, स्थलांतर व तात्पुरते प्रमाणपत्र छपाईच्या दराबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, इ. १० वी व इ. १२ वी साठी द्वितीय गुणपत्रक, द्वितीय प्रमाणपत्र, स्थलांतर व तात्पुरते प्रमाणपत्र मल्टीकलर मध्ये दिलेल्या सोबतच्या नमुन्यानुसार चेक परपोरेशन व नंबरींगसह प्रत्येकी १०० पानांचा एक बंच याप्रमाणे कोरी छपाई करुन घ्यावयाची आहे. त्यासाठी दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

त्यासाठी खालील अटी व शर्तीस अधिन राहून सोबत जोडलेल्या तपशिलाप्रमाणे सीलबंद दरपत्रके दिनांक ०४/०७/२०२४ ते दिनांक १२/०७/२०२४ या कालावधीत मागविण्यात येत आहेत. दिनांक १२/०७/२०२४ नंतर प्राप्त होणारी दरपत्रके कोणत्याही परिस्थितीत स्विकारली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दरपत्रकासाठी 'अ' व 'ब' लिफाफा पध्दत आहे.

## 'अ' लखोटयात सादर करावयाची कागदपत्रे

१. मुंबई दुकाने व संस्था अधिनियम १९४८ अन्वये अद्ययावत व्यवसाय नोंदणी परवान्याची छायाप्रत.

२. पॅन कार्डची छायाप्रत (आधारकार्डशी संलग्न असलेली )

३. GST नोंदणी प्रमाणपत्राची छ यायाप्रत.

४. विभागीय सचिव, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर या नावाचा रु. २२५०/- बयाणा रकमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष जोडणे आवश्यक किंवा रोखीने भरणा करणे आवश्यक.

## 'ब' लखोटयात सादर करावयाची कागदपत्रे

**१. मंडळाचे अधिकृत दरपत्रके.**

१. संगणकीय द्वितीय गुणपत्रक इ. १० वी
२. संगणकीय द्वितीय गुणपत्रक इ. १२ वी
३. संगणकीय द्वितीय प्रमाणपत्र इ. १० वी
४. संगणकीय द्वितीय प्रमाणपत्र इ. १२ वी
५. संगणकीय प्रोव्हीजनल प्रमाणपत्र इ. १० वी
६. संगणकीय प्रोव्हीजनल प्रमाणपत्र इ. १२ वी
७. संगणकीय मायग्रेशन प्रमाणपत्र इ. १० वी
८. संगणकीय मायग्रेशन प्रमाणपत्र इ. १२ वी

याप्रमाणे ०८ नमुन्याचे दर कळविण्यात यावेत

**अटी व शर्ती**

१. परिपूर्ण भरलेली दरपत्रके कार्यालयात दिनांक १२ /०७/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेत दुपारी ४.००पर्यंत कार्यालयाच्या आवक जावक शाखेत नोंद करुन समक्ष अथवा पोस्टाने सादर करावीत. त्यानंतर प्राप्त झालेली दरपत्रके कोणत्याही परिस्थितीत स्विकारली जाणार नाहीत.

२. सर्व करांचा समाविष्ट दरपत्रके भरण्यात यावीत. मान्य दराव्यतिरिक्त इतर कोणतीही दरवाढ अथवा वेगळा आकार दिला जाणार नाही.

३. सदरची छपाई प्राप्त झाल्यानंतर ते सुस्थितीत असल्याची खात्री झाल्यानंतरच देयकाची रककम NEFT/RTGS द्वारे अदा केली जाईल.देयकातून शासन नियमानुसार २ % TDS तसेच GST ची रक्कम कपात करण्यात येईल.

४. दरपत्रके उघडण्याची तारीख दूरध्वनीद्वारे कळविण्यात येईल. आपण स्वत: किंवा प्रतिनिधीनी उपस्थित रहावे. प्रतिनिधी उपस्थित राहणार असल्यास त्यास प्राधिकृत केल्याबाबतचे लेखी पत्र असणे बंधनकारक आहे.

५. कोणतेही दरपत्रक पूर्णत: / अंशत: स्विकारणे अगर नाकारणे याचा अंतिम अधिकार मा. विभागीय अध्यक्ष यांनी राखून ठेवलेला आहे.

६. दरपत्रकातील नमूद तपशिलाप्रमाणे छपाईचे साहित्य कार्यालयात सुस्थितीत पोहोच करण्याची जबाबदारी मान्य पुरवठादार याची राहील.

७. दरपत्रक मान्य झाल्यास ठेकेदारास रु. १००/- च्या स्टँप पेपरवर विहीत नमुन्यात करार करणे बंधनकारक राहील.

८. आवश्यकतेनुसार कराराची मुदत कमी करणे अथवा वाढवण याचे अधिकार विभागीय मंडळास राहतील. जर करारास मुदतवाढ दिली तर वाढीव कालावधीचा करारनामा करुन पूर्वीच्याच मान्य दराने काम पूर्ण करुन द्यावे लागेल.

९. मान्य झालेल्या ठेकेदारास सुरक्षा ठेव म्हणून रक्कम रु. ५,०००/- धनाकर्षाद्वारे ( D.D.) मंडळ कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे. सुरक्षा ठेव धनाकर्ष ( D.D.) विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर या नावाने राष्ट्रीयकृत बँकेचा असावा. त्यावर कोणतेही व्याज मिळणार नाही.

१०. कोणतेही दरपत्रक उघडणे अथवा नाकारणेचा अधिकार मंडळाचा राहील.

( सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.**
**५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.**

दरपत्रक सूचना क्र. कोविमं/ भांडार/ K -०८ / 1073 दिनांक :- 02 JUL 2024

# * दरपत्रक नोटीस *

द्वितीय गुणपत्रक, प्रमाणपत्र, स्थलांतर व
तात्पुरते प्रमाणपत्र छपाईच्या दरपत्रकाबाबत.

या कार्यालयासाठी द्वितीय गुणपत्रक, प्रमाणपत्र, स्थलांतर व तात्पुरते प्रमाणपत्र छपाई करुन घेणेसाठी अधिकृत पुरवठादार यांचेकडून दिनांक ०४/०७/२०२४ ते १२ /०७ /२०२४ या कालावधीत सोबत जोडलेल्या अधिकृत दरपत्रकानुसार सीलबंद पाकीटात दरपत्रक मागविण्यात येत आहेत. निविदा फॉर्म किंमत रु. १००/- इतकी असून ती ना परतावा आहे. निविदा फॉर्म दिनांक ०४/०७/२०२४ ते १२/०७/२०२४ अखेर सकाळी १० ते सायंकाळी ४.०० या वेळेत मंडळ कार्यालयात रोखीने विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

दिनांक १२/०७/२०२४ रोजी सांय. ५.०० वाजेपर्यंत प्राप्त होणा-या दरपत्रकांचाच विचार करण्यात येईल तद्नंतर प्राप्त दरपत्रके कोणत्याही परिस्थितीत विचारात घेतली जाणार नाहीत.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर.